# B.A. (Part–II) Examination
# MARATHI LITERATURE
## (Literatures of Modern Languages)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

**सूचना :— सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.**

1. पुढील गद्य-पद्य खंडाचे संदर्भासह अर्थसौंदर्य स्पष्ट करा :

(अ) सर्वज्ञें म्हणीतलें : हा एथ सरण आला पुडती तीहीं म्हणीतलें : 'जी जी हा : होडेचा ससा जी :

**किंवा**

गावां एका बीजें करीतां मार्गा पव्हे : तवं चामारू आणि चाम्हारी हाशं गेली होती : तीयें आली : चाम्हारें दंडवते घातली : श्रीचरणा लागला.

(आ) जवं जवं स्तुति करिति तवं तवं व्येथा काढिली : ऐसी स्तुति करीतां अवघी व्येथा काढिली।।

**किंवा**

जोगी म्हणीतलें : 'देवव्हो : जा : उकरडा व्याला : गावीं अरिष्ट जालें : तें गावीचां शांतिक केले : तेथ तुम्हां जेवण होईल.'

(इ) ऐसा होता आचार-विचार। गाव होईल न्यायभंडार।
जागृत असला सज्जन, चतुर सेवेसाठी।

**किंवा**

तेथे उदंड आयुष्य वाढते। जेथे प्रात:काळी स्वच्छता होते। कोणीहि न दिसे झोपला जेथे। प्राणीमात्र।।

(ई) काहींनी सांडपाणी साचविलें।
मच्छर, जंतु अति वाढले।
रोगराईनी बेजार झाले। रोजारी सगळे।।

**किंवा**

हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे। हे सूत्र घ्यानी ठेवोनि खरे।
आपुले ग्रामचि करावे गोजिरे। शहराहूनहि।। 20

2. 'लीळाचरित्र एकाका' तून श्री चक्रधरस्वामींचे दर्शन कसे घडते, ते स्पष्ट करा.

**किंवा**

'लीळाचरित्र : एकाक' मधील वाङ्मयीन सौंदर्याचा परिचय करुन द्या. 20

3. 'गोरक्षणी स्वरक्षण' असे राष्ट्रसंत 'गोवंश-सुधार' या अध्यायात का म्हणतात, ते लिहा.

**किंवा**

गावाच्या दारिद्रयाचे कारण कोणते ? ते सांगून स्वावलंबनाचे महत्व विशद करा. 20

4. साहित्यातील संवेदनात्मकता आणि भावनात्मकता म्हणजे काय, ते स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या विविध प्रयोजनांची सविस्तर माहिती द्या. 20

5. शास्त्रभाषा, व्यवहारभाषा आणि साहित्यभाषा यातील फरक स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध उलगडून दाखवा. 20